# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २९/०८/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

### चोरी

**१) पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत मौजा साई साफल्स पेट्रोलपंप काटोल बायपास रोड येथे दि. २२/०८/२०२२ चे २०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— अरूण ज्ञानेश्वर जिवतोडे, वय ३७ वर्ष, रा. खापरी पो. घोराड ता. कळमेश्वर यांचे ट्रक क्र. १) एमएम— ४०/यु— ६१२५ आयसर, २) एमएच— ३१/डीएस— १९०८, ३) एमएच/सीकु— १४२८, ४) एमएच— ४०/एन— २८८१, ५) एमएच— २०/सीटी— २८९८, ६) एमएच— ४०/एन— ६७९६ चे एकुण ६ बॅट्या एमरॉन कंपनीच्या किंमती अंदाजे १५,०००/—रू. तसेच पेट्रोलपंप जनरेटर ची बॅटरी कि. ३,०००/—रू. असा एकुण कि. १८,०००/—रू. चा मुद्देमाल व नगदी अज्ञात आरोपीने चोरी करून घेवून गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि प्रियंका गेडाम मो.नं. ९५०३९७३६५७ या करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील सोनखांब शिवार येथे दि. १९/०८/२०२२ चे १९.३० वा. ते दि. २०/०८/२०२२ चे ०७.१५ वा. सुमारास फिर्यादी नामे— त्र्यंबक तुकारामजी चांभारे, वय ४१ वर्ष, रा. सोनखांब, ता. काटोल यांची सोनखांब शिवारात शेती असुण त्या शेतात गुरे बांधण्यासाठी गोठा आहे व गोठयात एक गाय दोन कारवड असून ते फिर्यादी बांधुण ठेवतात व घरी परत जातात. त्या गोठयात लाईट साठी स्विच बोर्ड लावलेला आहे. दि २०/८/२२ चे ०७.१५ वा. दरम्यान फिर्यादी यांनी नेहमी प्रमाणे शेतात जावुन पाहिले असता गाईचा दावा सुटलेला होता व गाय बाजुला बसुण दोन्ही कालवड बांधुणच होती. गोठया जवळची जागा ही अस्ताव्यस्त होती. तिथे चप्पल, दोन बंदुक, नायलॉन रस्सा एक मोबाईल व कटर दिसून आला. त्यावरून फिर्यादिने शेतात आणखी पाहणी केली असता धुऱ्यावर बांधलेली रस्सी कापलेली दिसली. फिर्यादिने घाबरल्यामुळे लगेच पोलीस स्टेशन काटोल येथे माहिती दिली. पोलीसांनी शेतात जावुन पाहले असता शेतात सापडलेले दोन्ही कट्टे नकली होते ते जप्त करून सर्व साहित्य पोलीस स्टेशनला घेवुन आले. त्याच दिवशी दुपारी शेतात नागपुर वरून ४—५ मुले आले होते व फियादिचे शेतात एका मुलाला करंट लागुन मृत्यु झाला व दुसऱ्याला जख्म झाली. २—३ दिवसांनी फिर्यादिला समजले की, शेतात ४—५ चोर हे ०२ कारने जनावरे चोरी करणेकरीता आले होते व चोरी करण्याचे प्रयत्नात दोघांना करंट लागला व एक मरण पावला व एक जखमी झाला. यातील आरोपी याने शेतातील जनावरे चोरी करण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री आगासे मो.नं. ८४४६२८३९२५ हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत मौजा मानव शक्ती लेआउट उमरेड येथे दि. २५/०८/२०२२ चे २२.०० वा. ते २२.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— स्वर षिशिर सक्सेना, वय ३१ वर्ष, रा मानव, शक्ती लेआउट, उमरेड हे एमपी— २८/ एमक्यु— ५५७७ क्रमांकाच्या बुलेट रॉयल एनफिल्ड मोटरसायकलने डब्लुसिएल कॉलनी उमरेड येथे आपल्या मित्राकडे गेले व घरी परत २२.०० वा. येवुन घरच्या गेट समोर उभी करून घरामध्ये जेवण करायला गेले होते. त्यानंतर काही वेळाने ते जेवण करून बाहेर परत आले असता त्यांची किमंती ६०,०००/—रू. मोटरसायकल ची दिसुन न आल्याने आजुबाजु शोध घेतला असता परंतु मिळुन आली नाही. अज्ञात आरोपीने फिर्यादीची कि. ६०,०००/—रू. ची बुलेट मोटरसायकल चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक अरविंद चव्हाण हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**